ISSN 2349-638X

REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

MONTHLY PUBLISH JOURNAL

VOL-I | ISSUE-II | JULY | 2014

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- editor@aiirjournal.com
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

आधुनिक ग्रंथालयातील इलेक्ट्रॉनिक ई–स्त्रोताचे महत्व

पोळ रेश्मा विलास

ग्रंथपाल

तात्यासाहेब कोरे शिक्षणशाशास्त्र महाविद्यालय,

वारणानगर,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर

मोबा.नं.९१५८३२२६७७

सार

आधुनिक ग्रंथालयातील ई–स्त्रोताचे महत्व वाढत आहे. कारण आधुनिक युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग म्हणून पाहण्यात येते. या युगात ग्रंथालयाचे संगणकीकरण करण्यात आलेले आहे. ग्रंथालयात इलेक्ट्रॉनिक्स साहित्याचा वाढता ओघ पाहता ग्रंथालयाचे संगणकीकरण व डिजिटायझेशन करून ग्रंथालयात ई–बुक,ई–जर्नल्स,सी.डी.इ. वाचनसाहित्याचा वापर सर्व उपभोक्त्यांनी करावा यासाठी ग्रंथालय सातत्याने प्रयत्न करीत आहेत. ते स्पष्ट होते.

प्रस्तावना

पारंपारिक ग्रंथालयाच्या स्वरूपात आमुलाग्र बदल होऊन आता त्यास आधुनिक ग्रंथालयाचे स्वरूप येऊ लागले आहेत्र आधुनिक काळातविविध प्रकारची माहिती ग्रंथ,नियतकालिके या पारंपारिक माध्यमा बरोबरच दृक श्राव्य साधने,मायक्रोफॉमर्स,पेटंटस व्यापार वाङ्.मय संगणकीय डेटावेस तसेच अटरनेट ई बुक,ई जर्नलस, सीडी इ.नवीन प्रकारच्या वाचन साकिहत्यामधून उपलब्ध केली जात आहे.

आधुनिक काळातकील वाचन साकिहत्याचे वाढण्याचे विविध प्रकार आणि श्शतकाच्या आखेरीस,माहिती तंत्रज्ञानाच्या माणवी जिवनात प्रवेश झाला आहे. ग्रंथालयेही त्यात आपवाद नव्हती.पाश्च्यात देशात १९८० मध्ये संगणकाचा ग्रंथालयात प्रवेशझाला. ग्रंथालयात संगणकाच्या वापरा मुळे माहिती श्शोधण्याचे काम सोपे झाले तर इंटरनेटच्या ग्रंथालयातील प्रवेशा मुळे हवी असलेली माहिती विविध वेब साईटच्या माध्यमातूनमोठया प्रमाणात उपलब्ध होवू लागली.

इंटरनेट आणि डिजीटल तंत्रज्ञानाच्या विकासामुळे डिजीटल स्वरूपात माहिती प्रकाशित करणे शक्य झाले दृ छापील साहित्य प्रकाशना प्रमाणे ई स्वरूपातील साहित्य प्रकाशनाचा वेग वाढतो आहे.या पार्श्व भुमीवर ग्रंथालयात विविध ई स्वरूपातील साहित्याची उपलब्धता हळू हळू वाढते आहे. ई स्वरूपातील साहित्याचा ग्रंथालय संग्रहातील समावेशामुळे ग्रंथालय साहित्य संग्रहाचे स्वरूप दिवसेन दिवस बदलत असून यास मिश्र,हायब्रिड स्वरूप म्हणता येईल .अशा प्रकारचे साहित्य संग्रह ग्रंथालयात विकसित होत आहे.

इलेक्ट्रॉनिक ग्रंथालय संकल्पना

तंत्रज्ञानाचा जसा जसा विकास होत गेला तसे तसे ग्रंथालयीन साहित्याचे स्वरूप ,वाचक बदलत गेले.संगणकाच्या आगमना बरोबरच इलेक्ट्रॉनिक साहित्य व त्याच्या वापरासाठी साधन सामग्री उपलब्ध झाली.ग्रंथालयात ऑडीओ, व्हिडीओ,ध्वनी चित्रमुद्रीका पहाता येवू लागली.सिडी ड्राइव्ह ,मल्टीमिडीया ,सोयी मुळेहवी ती माहिती साठवून घेता येवू लागली. ग्रंथवाचनासाठी ई बुक रिडींग यंत्रा मुळे अंध व्यक्तिना वाचनासाठी सोय झाली. या सर्व इलेक्ट्रॉनिक माध्यमाच्या अस्थित्वामुळे इलेक्ट्रॉनिक्स् ग्रंथालय संकल्पणा अस्थित्वात आली.

ई–स्त्रोत साहित्याची व्याख्या

इलेक्ट्रॉनिक ग्रंथालय म्हणजे,शास्त्रशुद्ध पद्धतीने तयार केलेले व डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करुन ते वापरण्यासाठी विविध अंगाचे वापरण्याजोगे उपलब्ध साहित्य संग्रह होय.

टेरेन्स स्मिथ

असे साहित्य की जे विविध प्रकारच्या संगनकाव्दारे उपलब्ध होते त्यास ई स्त्रोत असेही म्हणतात.अशाप्रकारचे साहित्य उपभोक्त्याना ग्रंथालयातून देण्यात येत आहे.

ई रिसोर्स म्हणजे काय ?

संपूर्ण प्रलेखाचा Data Base E-Journal प्रमिमा स्थिर व चलन चित्राचा समुह आणि तत्सम बहुसंज्ञापन माध्यमातील माहिती ई स्त्रोत असेही म्हणतात. इलेक्ट्रॉनिक/अंकिय स्वरुपात CD Rom,Magnatic tape/Internet वर शुल्क/नि:शुल्क उपलब्ध केले जातात त्यास ई रिसोर्स असे म्हणतात.

आधुनिक ग्रंथालयातील ई–स्त्रोताचे महत्व

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात माहितीचा प्रस्फोट झाला आहे त्यामुळे माहिती ही प्रचंड प्रमाणात उपलब्ध होत आहे.त्यामुळे ग्रंथालयात ई रिसोर्स सारख्या साधनांची आवश्यकता भासत आहे.अशा नविन स्वरुपात निर्माण होणारी माहिती लवकरात लवकर वाचकापर्यंत पोचवण्याचे एकमेव साधन म्हणजे संगणक होय. संगणकाच्या मदतीने इंटरनेटच्या माध्यामातून ही माहिती वाचकापर्यंत पोहचवली जाते.

वाचकांची वाढती मागणी लक्षात घेता कमी जागा व्यापणारे ज्ञान साहित्य म्हणून ग्रंथालयातील ई–स्त्रोताची गरज षसत आहे.ग्रंथालयातील ई–स्त्रोताचे महत्व खालिल मुद्याच्या आधारे अधिक स्पष्ट होईल.

१)कमीत कमी वेळेत चांगल्या प्रकारे सुविधा देणे शक्य

अतिशिय वेगाने धावणा–या आधुनिक जगात सर्वच जलद अचूक व नेमकया असाव्यात अशी अपेक्षा असते. आज माहितीचा प्रस्फोट,वाचकांच्या माहिती विषयक वाढणा–या गरजा आणि कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त चागल्या प्रकारे सुविधा देण्यासाठी ई स्त्रोत ग्रंथालयात असणे गरजेचे बनले आहे.तसेच विद्यापीठ आणि महाविद्यालयामध्ये संशोधनास प्रोत्साहन दिले जात असल्याने आता विद्यापीठीय आणि महाविद्यालयात ग्रंथालयामध्ये ई स्त्रोताचा वापर आवश्यक बनत आहे.

२)व्यापक माहितीचा कमी जागेत संग्रह शक्य

माहितीच्या प्रस्फोटामुळे ज्ञानाचे भांडार दिवसें दिवस वाढतच चालले आहे.परंतू हे साहित्य साठवून ठेवण्यासाठी जागेची कमतरता भासत आहे.छपाई माध्यमातील संसाधनांच्या संग्रहासाठी जास्त जागा लागते.त्यामानाने इलेक्ट्रॉनिक्स संसाधनाच्या साह्याने खूप माहिती अत्यंत कमी जागेमध्ये संग्रह करणे शक्य होते.म्हणूनच कमी जागा व्यापणारे ज्ञान साहित्य म्हणून ई स्त्रोताचे महत्व आहे.

३)वापरातील बहुविधता

एकच दस्तऐवज परिशिष्ठ इत्यादी कागदपत्र एकाच वेळेस अनेक ठिकाणी एकाच वेळी केंव्हाही वापरू शकतो.

४)शोध पध्दत

इंटरनेटवर सर्व बारच्या माध्यमातून हवी ती माहिती तातडीने सहजरित्या शोधता येते.

५)आशय

छपाई केलेल्या ग्रंथामध्ये समाविष्ट ज्ञानास मर्यादा पडतात मात्र सीडीमध्ये अथवा इंटरनेटवर भरपूर माहिती मल्टीमिडीया इफेक्टस उपलबध आहे.

६)पन:वापर

ई संसाधनाच्या वापरामार्फत सहजरित्या माहिती पाहिजे त्यावेळी पुन:प्राप्ती होऊ शकते.

७)जागतिक जोडणी

ईटरनेटच्या माध्यमातून जागतिक स्तरावरील माहिती आपल्या वाचकांना ग्रंथालयाव्दारे पुरवू शकतात त्यामुळे वाचकांची माहिती विषयक गरज भासते.

उपरोक्त विवेचनावरून ई स्त्रोत उपलब्ध झाल्यामुळे शोध प्रणाली अगदी विकसीत झाली आहे.संगणक प्रणाली संग्रहण प्रणाली व प्रतिप्राप्ती प्रणाली असल्यामुळे पाहिजे ती माहिती कमी वेळेत प्राप्त होवू लागली.म्हणून ई स्त्रोत ग्रंथालयासाठी पाहिजे ती माहिती कमी वेळेत प्राप्त होवू लागली. म्हणून ई स्त्रोत ग्रंथालयासाठी ही संशोधनाची गरज ठरु लागली.तसेच आशययक्त मजकूर असल्यामूळे चलचीत्र व ध्वनी यांच्या स्वरुपात मजकूर किंवा माहिती मिळत असल्यामूळे ई स्त्रोतांची गरज भासू लागली आहे.वाचकांच्या गरजांना अनुसरुन रंगनाथ यांच्या पंचसूत्रीप्रमाणे वेळेच्या आत सेवा देता येण्यासाठी ई स्त्रोतांचा वापर ग्रंथालयात अपरिहार्य झाला आहे.

समारोप

ग्रंथालयात वाचनसाहित्य मोठयाप्रमाणात वठत आहे.वाठते वाचनसाहित्य मागणी वाढत असल्यामूळे माहिती विषयक गरजांचा समन्वयकरुन कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त चांगल्या माहिती सुविधा ग्रंथालयात देण्यात येतात व ई स्त्रोताचा सर्वच ग्रंथालयात मोठया प्रमाणात वापर करण्यात येत आहे.

संदर्भ सूची

फडके,द.ना.(२००६):ग्रंथालय संगनकिकरण आणि आधुनिकिकरण,पुणे,युनिव्हर्सल प्रकाशन,पृष्ठ ४७७ते४९२

कुंभार,राजेंद्र(२००७):डिजिटायजेशन कार्यालयातील विविध घटकांच्या जबाबदाऱ्या व योगदान,नाशिक,ज्ञानगंगोत्री,य.च.म.मु. वि.

Vyas, K.N. (2005), Information Technology for e-Libraries; Jaipur; Raj publishing House.

Chowdhury,G.G.&Chowdhury S.(2003); Information to digital libraries,London, Facet publishing.